**निवीदा क्रमांक (०१)**

**पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड**

नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील मोटार परिवहन विभाग,पोलीस मुख्यालय,नांदेड येथील सन २०२३-२४ आणि सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता कंपनीचे अधिकृत पुरवठाधारक यांचे कडून **सर्व प्रकारचे चारचाकी व दुचाकी शासकीय पोलीस वाहनाचे** सुटेभाग खरेदी आणि दुरुस्ती करणे साठी खालील प्रमाणे कामकाजाचे निवीदा मागविण्यात येत आहे.

१) सर्व प्रकारचे दुचाकी व चारचाकी, हलक्या, मध्यम व जड वाहनाचे सर्व सुटेभाग पुरवठा करणे व दुरुस्ती करणे, २) टायर टयुब व पंक्चर दुरुस्ती, ३) रेडीएटर दुरुस्ती, ४) ॲटो ईलेक्ट्रीक, अल्टरनेटर, व स्टार्टर दुरुस्ती करणे, ५) व्हिल अलोयटमेंट व बॅलन्सींग करणे, ६) स्प्रिंग/पाटे मोपींग व दुरुस्ती करणे, ७) बुश प्रेसींग व फिटींगची कामे करणे, ८) इंजिन मशिनींगचे व इतर लेथवर्कची करणे, ९) मध्यम व जड (L/V ५ Tunner, Bus) वाहनांची मेकॅनिकल दुरुस्ती तसेच गैस/ईलेक्ट्रीक वेल्डींग, डेन्टींग व कलरिंगची कामे करणे, १०) हलक्या (कार व जिप) वाहनांची मेकॅनिकल दुरुस्ती, ११) वाहनांची डेन्टींग, वेल्डींग, स्प्रे कलरिंगची कामे, १२) सर्व प्रकारचे चार व दुचाकी वाहनाचे कुशनिंग व रिपेअरींगची करणे, १३) डिझेल वाहनांची एफ.आय.पंप व इंजेक्टर दुरुस्तीची करणे, १४) वाहनांमध्ये ए.सी.गॅस भरणे व ए.सी.दुरुस्तीची करणे, १५) ॲक्सेसरीज साहीत्यांचा पुरवठा करणे, १६) रेडीएम वर्क, नंबर प्लेट इत्यादी, १७) वाहनांची पी.यु.सी.तपासणी करणे, १८) सर्व वाहनांचे संरक्षक जाळयाची कामे, व सर्व्हिसींग करणे, १९) कंपनीचे अधिकृत पुरवठाधारकांकडून सर्व प्रकारचे दुचाकी व चारचाकी वाहनांचे सर्व्हिसींगची सर्व कामे करणे.

ईच्छुक कंपनीचे अधिकृत पुरवठाधारकांसाठी अटी व शर्ती - निवीदाधारक हे कंपनीचे अधिकृत पुरवठाधारक असणे आवश्यक आहे. शॉप ॲक्ट लायसन्स, पॅनकार्ड, आधार कार्ड, शासकीय वाहनांची दुरुस्ती ही उधारी तत्वावर करावी लागेल, सुटेभाग पुरवठादारांनी सोबत प्राईज लिस्ट (एम.आर.सी.प्रमाणे) त्यावर देण्यात येणारी सुट,जी.एस.टी. इत्यादी स्वतंत्र दर्शवावी, पुरवठादारांनी सुटेभाग हे पार्ट नंबर पॅकींग असलेले देणे आवश्यक आहे. २४ तास सेवा दयावी लागेल, दुरुस्तीची कामे प्रथम प्राध्यान्याने तात्काळ व वेळेत करुन दयावी लागतील, केलेल्या कामाचे डिलीव्हरी चलन कामांचे दरासह दिलेल्या मुदतीतच सादर करावे लागतील, सुटेभाग पुरवठा आणि दुरुस्तीचे कामाची देयके ०४ प्रतीत केलेल्या कामाचे विवरणासह मुदतीत सादर करावे, दुकानाचे नावे राष्ट्रियकृत बँकेत खाते असणे आवश्यक असून, बँकेचा तपशिल त्याचा पुराव्याची प्रत सादर करावे.

ईच्छुक कंपनीचे अधिकृत पुरवठाधारकांचे निवीदा हे दिनांक २०/०७/२०२३ ते दिनांक ३१/०७/२०२३ पावेतो पोलीस उप अधीक्षक(गृह),पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड येथे कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येईल. सदर निवीदा मंजूर करण्याचा किंवा मंजूर झाल्यानंतर कोणत्याही क्षणी रद्द किंवा फेरबदल करण्याचा संपूर्ण अधिकार पोलीस अधीक्षक,नांदेड यांनी राखून ठेवला आहे. निवीदा सादर करण्यास काही अडचण उदभवल्यास किंवा अधिक माहिती पाहिजे असल्यास पोलीस उप अधीक्षक(गृह),पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.